तक्रार वजा विनंती अर्ज क्रं. २

दिनांक : २३/०३/२०२४

प्रति,

मा.डॉ.हेमंत वसेकर भा.प्र.से.,

प्रकल्प संचालक,

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, पुणे

विषय :- स्मार्ट प्रकल्पांतर्गत करारपध्दतीने कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे चौकशी बाबत धोरण / मार्गदर्शक सुचना, नियम व तरतूदी मधील विरोधाभासाबाबत तक्रार.

संदर्भ :- १) आपण दिनांक १४/०७/२०२३ रोजी, अंतिम केलेला चौकशी समितीचा अहवाल.

२) मा.श्री.अशोक बाणखेले, अध्यक्ष - चौकशी समिती तथा नोडल अधिकारी, PIU(Agri) यांचे पत्र क्रं. २१२० दिनांक १४/०७/२०२३

२) मा.श्री.अशोक बाणखेले, जन माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, PIU(Agri) यांचे पत्र क्रं. ३४ दिनांक ०६/०२/२०२४

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने खालील प्रमाणे सविनय सादर करतो की,

१. PIU (Agri) चे चौकशी समितीने माझे विरूध्द श्री.नितीन मिसाळ, प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांनी दिनांक २३/०६/२०२३ रोजी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने चौकशी करून, संदर्भ क्रं. १ व २ अन्वये, चौकशी अहवाल अंतिम करून माझे सेवा समाप्त करून माझे नांव काळय यादीत समाविष्ठ करण्याबाबत शिफारशी / शिक्षा केलेली आहे.

२. श्री.नितीन मिसाळ, प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांनी माझे विरूध्द केलेली तक्रार ही निराधार व धादांत खेटी असलेबाबत मी वेळो-वेळी प्रकल्प कार्यालयास अवगत केले आहे. तसेच याबाबत मी स्वत दिनांक १३/०७/२०२३ रोजी माझा लेखी खुलासा दिलेला असून संबंधीत CBO, DIU यांनी सुध्दा त्यांचे लेखी म्हणने पुराव्यासह सादर केले आहे. तथापी चौकशी समितीने सदर परिस्थितजन्य पुरावे, प्रत्यक्षातील वस्तुस्थिती, नमुद आरोपांचे अनुषंगाने पुराव्यांची पडताळणी, तक्रारदाराचे बनावट व बोगस कागदपत्रांचे गांर्भिय इत्यादी विचारात न घेता केवळ तक्रारदार यांनी केलेल्या चुकीच्या व निराधार अर्जावर विसंबून राहून पुर्वग्रह दुषीत पध्दतीने कार्यवाही केली. यामुळे माझे व माझे कुटुंबाचे विनाकारन मानसिक, शाररिक, सामाजिक व आर्थिक खच्चीकरण घडून आले आहे.

३. वरिल प्रमाणे क्रं. १ मध्ये नमुद कार्यवाहीचे अनुषंगाने प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचना, धोरण, नियम व कार्यपध्दतीची माहिती मिळणेबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज दाखल करण्यांत आला होता. सदर अर्जास संदर्भ क्रं. ३ अन्वये, PIU (Agri) यांचे जनमाहिती अधिकारी यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिलेले आहे.

"प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कृषि कार्यालय हे प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष स्मार्ट प्रककल्प पुणे यांचे अधिपत्याखाली कार्यरत आहे. PIU मार्फत करार पध्दतीने कर्मचारी नेमणुक केली जात नाही त्यामुळे करारपध्दतीने कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे चौकशी बाबत धोरण / मार्गदर्शक सुचना नियम तरतूदी ठरविण्याचा अधिकार या कार्यालयास नाही"

४. उपरोक्त प्रमाणे, संदर्भ क्रं. १ व २ अन्वये, PIU (Agri) चे चौकशी समितीने दिनांक १४/०७/२०२३ रोजी अंतिम केलेला चौकशी अहवाल, माझे सेवा समाप्ती व नांव काळया यादीत समाविष्ठ करणे इत्यादी गंभिर व माझे कारकीर्द तथा कौटुंबिक जिवनहितावर दुरागामी परिनाम करणा-या गंभिर स्वरूपाच्या शिफारशी / शिक्षा निर्धारीत करण्यांची केलेली कार्यवाही आणि संदर्भ क्रं. ३ अन्वये, PIU (Agri) चे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर विचारात घेता, पुढील प्रमाणे तक्रार नोंदवत आहे.

i) संदर्भ क्रं. ३ अन्वये, PIU (Agri) चे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर विचारात घेता, जर PIU(Agri) यांना "करारपध्दतीने कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे चौकशी बाबत धोरण / मार्गदर्शक सुचना नियम तरतूदी ठरविण्याचे अधिकार" नसतील तर,

अ) संदर्भ क्रं. १ व २ अन्वये, अंतिम करण्यांत आलेला चौकशी समितीचा अहवाल कशाचे आधारे अंतिम करण्यांत आला आहे.

आ) संदर्भ क्रं. १ व २ अन्वये, अंतिम करण्यांत आलेला चौकशी समितीच्या अहवालामध्ये माझे सेवा समाप्ती व नांव काळया यादीत समाविष्ठ करण्याची शिफारस / शिक्षा चौकशी समितीने कशाचे आधारे निर्धारित व निश्चित केली आहे.

इ) संदर्भ क्रं. १ व २ अन्वये, अंतिम करण्यांत आलेला चौकशी समितीचा अहवाल प्रकल्पाच्या ज्या मार्गदर्शक सुचना, नियम, कायदे, कलमे, तरतूदी व कार्यपध्दी चे अधिन राहून अंतिम करण्यांत आला आहे, त्यांचे संदर्भ चौकशी अहवालात नमुद करण्यांत आलेले नाहीत.

ई) संदर्भ क्रं. १ व २ अन्वये, अंतिम करण्यांत आलेला चौकशी समितीचा अहवालात निर्धारित केलेल्या शिफारशी / शिक्षा प्रकल्पाच्या ज्या मार्गदर्शक सुचना, नियम, कायदे, कलमे, तरतूदी व कार्यपध्दी चे अधिन राहून अंतिम करण्यांत आला आहे, त्यांचे संदर्भ चौकशी अहवालात नमुद करण्यांत आलेले नाहीत.

उपरोक्त नमुद तक्रार अर्जाचे अनुषंगाने उचित कार्यवाही व्हावी, ही नम्र विनंती.

(सुनिल विजय शेलार)
ह.मु. प्लॉट क्रं. ५८ अ, पीएमटी कॉलीन,
श्री जय तुळजा भवानी माता सह.गृ.संस्था,
बिबवेवाडी, पुणे, महाराष्ट्र - ४११०३७

प्रत, माहितीसाठी सेवेत सविनय सादर.

१) मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प, पुणे
२) मा. प्रमुख, पीआययु (कृषि), स्मार्ट प्रकल्प, पुणे
३) मा. प्रमुख, आर.आय.यु.(स्मार्ट), विकृसस, पुणे
४) मा. श्री. अशोक बाणखेले, अध्यक्ष - चौकशी समिती तथा नोडल अधिकारी, PIU (Agri)
५) मा. श्री. सचिन शिंदे, सदस्य - चौकशी समिती तथा तंत्र अधिकारी, , PIU (Agri)
६) मा. श्री. विवेक मराळ, सचिव - चौकशी समिती तथा कंत्राटी संपादन अधिकारी, PIU (Agri)
७) मा. व्यवस्थापक, T & M कंन्सलटंसी सर्व्हीसेस, मुंबई